# ग्राम विकास विभाग,महाराष्ट्र राज्य

# संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,बेलापूर नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्रमांक -०२२-२७५६०३११ ई - मेल directoriayruralhousing@gmail.com


जा. क्र. राव्यक-ग्रागृ/लेखा (रायो)/८२० / २०१९ दि. ०१ /०८/२०१९

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय:- ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करावयाच्या धोरणांतर्गत संगणकीय प्रणालीवरील नोंदी (EDIT) करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

संदर्भ:- 1. शासन निर्णय क्र. प्रआयो-2018/प्र.क्र. 348/यो-10, दि. 16.02.2018.
2. शासन निर्णय क्र. प्रआयो-2018/प्र.क्र. 256/यो-10, दि. 20.8.2018.
3. शासनाचे सम क्रमांकाचे दि. 05.11.2018, दि. 19.11.2018 व दि. 24.12.2018 चे पत्र.

ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रक 1 व 2 अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन पत्र क्र. 3 अन्वये संगणक प्रणालीवरती अतिक्रमणाच्या नोंदीबाबत करावयाच्या कार्यवाहीची कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे.

अतिक्रमणे नियमानुकुलबाबत संगणक प्रणालीमध्ये केलेल्या नोंदीच्या दुरुस्ती (Edit) ची मागणी करण्यात येत आहे. त्यास अनुसरुन संगणक प्रणालीवर दुरुस्ती (Edit) करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

1. नोंदीची दुरुस्ती हा पर्याय केवळ ग्रामसेवक लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार गटविकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर मान्यतेसाठी प्रलंबित असलेल्या अतिक्रमणाबाबत दुरुस्ती करावयाची असल्यास सदर अतिक्रमणे Reject करुन ग्रामसेवक लॉगिन मध्ये परत पाठवण्यात यावेत. अतिक्रमणे दुरुस्तीसाठी Reject करताना Remarks या option मध्ये त्याबाबतची कारणे सविस्तर नमूद करावेत व त्या सूचनाप्रमाणे ग्रामसेवक यांनी योग्य ती सर्व दुरुस्ती करावी.

2. ग्रामसेवक लॉगीन मधून अतिक्रमणाच्या खालील नोंदीच्या दुरुस्ती करता येतील.
   a. मिळकत नंबर (१९९९-२०००, २०१०-११, २०१७-१८)
   b. जमिनीचा प्रकार
   c. परिशिष्ट अ (PDF Upload)
   d. परिशिष्ट क (PDF Upload)
   e. ग्रामसभा ठराव (PDF Upload)
   f. अतिक्रमित मिळकतीचा आतील व बाहेरील फोटो
   g. अतिक्रमण धारकाचे नांव
   h. अतिक्रमण क्षेत्र (१९९९-२०००, २०१०-११, २०१७-१८)

C:\Users\User\Downloads\Encroachment draft final.docx

Scanned by CamScanner

3. उपरोक्त सर्व प्रकारच्या दुरुस्ती अतिक्रमणनिहाय एकाच वेळी करण्यात यावी. प्रणालीमध्ये नोंदी दुरुस्ती (Edit) ची कार्यवाही केल्यानंतर **"Save"** व **"Forward"** हे दोन पर्याय उपलब्ध करुन दिलेले आहेत. **"Save"** या पर्यायामध्ये दुरुस्त केलेली अतिक्रमणे ग्रामसेवक लॉगीनमध्ये **Save** होतील, तर **"Forward"** या पर्यायामध्ये दुरुस्त केलेली अतिक्रमणे **Save** सह गट विकास अधिकारी लॉगीन मध्ये **Forward** होतील. **एकदा Forward केलेली अतिक्रमणाची नोंद पुन:श्च दुरुस्तीसाठी उपलब्ध होणार नसल्याने ग्रामसेवक यांनी अतिक्रमण गट विकास अधिकारी यांचेकडे Forward करण्यापूर्वी सर्व नोंदीची दुरुस्ती झाल्याची खात्री करावी.**

अतिक्रमण नोंदीची प्रणालीमध्ये सर्व दुरुस्ती व्यवस्थित होणेसाठी गट पातळीवर गटविकास अधिकारी यांनी याबाबत ग्रामसेवक यांची कार्यशाळा घेऊन नोंदीतील सर्व दुरुस्ती करुन घ्यावी.

4. अतिक्रमणे दुरुस्तीमध्ये ज्या अतिक्रमण धारकाचे नांव व अतिक्रमण क्षेत्रामध्ये बदल झाला आहे अशी अतिक्रमणे गट विकास अधिकारी यांचेकडे **Forward** होणार नाहीत. सध्या ती ग्रामसेवक लॉगिन मध्ये राहतील. (Hold)

5. अतिक्रमण नियमानुकूल प्रणालीमध्ये नोंदीची दुरुस्ती (Edit) हा पर्याय १५ दिवसांकरिता उपलब्ध राहील. सदर कालावधीमध्ये अतिक्रमण नोंदीची दुरुस्ती करुन घेण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत आढावा घेवून नोंदीच्या दुरुस्तीची कार्यवाही विहीत कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

आपला,

(स्वाक्षरी)

धनंजय माळी (भा.रा.से.)
संचालक

प्रत:- प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

1. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
2. उपसचिव योजना-10, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई

प्रत:- प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाही करीता :-

1. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) (सर्व)
2. प्रोजेक्ट मॅनेजर सीएसपी, ई-गव्हर्नन्स इंडिया प्रा. लि.

ग्राम विकास दूत

Scanr